CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

लक्ष्मीमाहात्म्य.

आर्या.

"हे लक्ष्मी तव महिमा मोठ्यामोठ्यांसही नये गाया ।
तेथें इतरजनांचा प्रयत्न जाईल कां न गे वांया ॥ १
तुजवर जीव जनांचा सुखसाधन ह्मणुनि लागतो जितका ।
स्त्रीवर सहोदरावर आईवापांवरी नसे तितका ॥ २
त्वत्प्राप्त्यर्थ श्रमती खटपटती झगडती रणीं मरती ।
वदती असत्य नाना-विध दुसरीं घोर पातकें करती ॥ ३
कीं तुझिया ठायीं जो गुण तो इतरीं न आढळे कोठें ।
त्याचा प्रभाव पाहुनि चित्ताला नवल वाटतें मोठें ॥ ४
तूझ्या योगें होती अवगुण ते गुण समस्तहि जनांत ।
याचा अनुभव येतो खुपतो तो नित्य शिष्टनयनांत ॥ ५
ज्याच्या येथें वससी तो असला कोळसा तसा काळा ।
तरि सांवळा ह्मणुनियां करिती गौरव कधीं न कंटाळा ॥ ६
खादाड भला असला तर भोक्ता तो ह्मणोनि वानीती ।
कृपण जनाला ह्मणती सावध बहु दूरदृष्टि हे रीती ॥ ७
भोळा शंकर पावे नांव अजागळ मनुष्य वेडगळ ।
ऐसा प्रकार उलटा त्वत्प्राप्तीनें घडे पहा सकळ ॥ ८
परिस निजस्पर्शानें लोहा करितो सुवर्ण कीं जैसें ।
तूं निजसहवासानें दुर्गुण करितेस ते सुगुण तैसे ॥" ९

(बालबोध.)

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

सातव्या आवृत्तीची प्रस्तावना.

ही आवृत्ति पूर्वीच्या आवृत्तींतील अशुद्धें काढून टाकून छापली आहे.

२१-७-१०. निबंधकर्ता.



No. 6068 of 1887-88.
Poona, Office of the Director of
Public Instruction.
23rd January, 1888.

To,

Mr. K. M. JOGLEKAR,
Baroda.

SIR,

With reference to your letter dated 17th August 1886, I have the honour to state that the Curator Government Central Book Depôt, has this day been requested to enter your work on the list of books sanctioned for Libraries and Prizes.

I have &c.,
(By order)
(Sd.) N. K. GOLE.
Head Assistant
Director of Public Instruction.

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

पैसा.

मुलांनो ! विलायतेस एक प्रसिद्ध कादंबरीकार झाला. त्यानें एका ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, द्रव्य ह्मणजे पत. गरीब लोकांत हा प्रकार उलटा आहे. एखाद्या मजुराला कामावर ठेविलें आणि त्यानें आपलें काम चांगलें केलें ह्मणजे त्याला त्याचा रोजमुरा मिळतोच, पण त्याशिवाय त्याला आणखी एक फायदा होतो, तो त्याला पुढें फार उपयोगीं पडतो. तो फायदा कोणता ह्मणाल तर त्यानें काम चांगलें केल्याबद्दल मालकाकडून जी त्याला शाबासकी मिळते व जी त्याला दुसरीकडे काम मिळविण्यास उपयोगीं पडते ती. तसेंच इमानीपणा, सचोटी, आणि मेहेनत यांबद्दल ज्या मनुष्याची माझेजवळ पत असेल त्याला मी गरज लागेल तेव्हां अवश्य कामावर बोलावीन. त्या मनुष्यानें काम करण्यांत चांगली हुषारी किंवा कुशलता दाखविली तर त्याबद्दल जें त्याचें नांव होईल तेंही त्याला दुसरे ठिकाणीं फार उपयोगी पडेल ; ह्मणजे, हाही त्याला एक प्रकारचा फायदाच आहे. ह्मणून गरीब लोकांत नांव किंवा पत हें एक प्रकारचें द्रव्य आहे, पण त्या वर्गातील लोक ज्या रीतीनें आपल्या द्रव्याचा व्यय करतील त्यावर त्यांचें नांव अवलंबून राहील.

या संसारांत पैसा मनुष्याला एक प्रकारची विलक्षण शक्ति देतो. आणि दरएक मनुष्य आपले पैशाचा ज्या रीतीनें व्यय करितो तितक्यानेंच त्याचें बहुतेक वर्तन जगाच्या नजरेस येतें आणि तो कसा असेल याचा लोक अजमास करितात. आपण पैसा नीतीनें मिळविला आणि आपण त्याचा विचारानें खर्च केला ह्मणजे जगांत आपलें नांव होतें व तेणेंकरून आपणास मान मिळूं लागतो. आपला कांहीं पैसा लोकहिताकडे खर्च झाला ह्मणजे आपल्याला लोकांत मान मिळतो, आपली कीर्ति होते, आपली स्तुति होऊं लागतें, व अनेक लोक आपणांस पूज्य मानूं लाग-

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

तात. बरें, आपण पैसा वाईट मार्गानें मिळविला आणि तो अविचारानें उधळून टाकिला तर काय परिणाम होतो पहा! पैशापरी पैसा जातो, आणि आपलें नांव व अब्रू हीं एका क्षणांत नाहींशीं होतात. जर आपण नीच कृतींनीं ह्मणजे लांच खाऊन किंवा लोकांस फसवून पैसा मिळविला व कृपणपणानें पेटींत बंद करून त्याचा संचय करून ठेविला तर काय उपयोग! तो पैसा आपण पुजून ठेवितों इतकेंच नाहीं, तर तो वाईट मार्गानें मिळाल्यामुळें मनाला सदोदित एक तऱ्हेचा हृद्रोग लागलेला असतो; आणि सद्व्यय केल्यानें मनाला जें समाधान वाटतें तेंही मिळत नाहीं. सारांश, कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी असें कबूल करावें लागेल कीं, ज्या घोरणानें मनुष्य आपला पैसा खर्च करील त्या घोरणावर त्याचें नांव, अब्रू, पत, सर्व कांहीं अवलंबून राहील.

लक्ष्मी मोठी वाचाळ आहे. तिचें पाहिजे त्या रीतीनें तोंड बंद केलें तरी ती बोलल्यावांचून कधींही रहाणार नाहीं. आपले धन्याचे सद्गुण प्रसिद्धीस आणण्यास तिला फार वेळ लागतो, पण त्याचे दुर्गुणाचा घोष करण्यास तिला निमिषमात्र देखील लागत नाहीं. ह्मणून लक्ष्मी घरीं आली असतां आपण फार सावधगिरीनें वागलें पाहिजे. .

मनुष्याचे अंगीं जी सारासार विचारशक्ति असते तिचा संपत्ति संभाळण्यांत त्यानें शहाणपणानें उपयोग केला पाहिजे.

ह्या शक्तीचा योग्य उपयोग करण्यासाठीं मनुष्यानें आपला स्वभाव आणि वृत्ति हीं दोन्हीं व्यवस्थित राखलीं पाहिजेत. आपले द्रव्याची चतुराईनें व्यवस्था लावून आपणास जगांत शहाणें ह्मणवून घेण्याची, अब्रू संपादन करण्याची, आपले बांधवांस उपयोगी पडण्याची व ह्या प्रकारें आपलें कर्तव्यकर्म करून समाधान मिळविण्याची इच्छा असेल तर आपलें दररोजचें संसारांतील वर्तन व्यवस्थेशीर पाहिजे.

संपत्तीच्या व्ययाबद्दल कोणी कसेही नियम केले तरी त्यांतील प्रथम नियम फारच लहान आहे. त्याचा चार शब्दांत समावेश होतो. तो कोणता ह्मणाल तर **"कर्जाला भिणें आणि त्यापासून लांब राहणें."**

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

कर्ज हा सर्वग्रासी प्रचंड शत्रु आहे असें सदोदित मनांत वागविलें पाहिजे. एकदां आपण त्या शत्रूचे सपाट्यांत सांपडलों कीं त्यापासून कधींही आपली सुटका होणार नाहीं. मनुष्याचे उन्नतीला आणि सुखाला मनाची स्वस्थता आणि स्वातंत्र्य हीं फार अवश्य आहेत. एकदां कर्ज काढून कोणी आपलें स्वातंत्र्य धोक्यांत घातलें ह्मणजे त्यास ज्या निस्पृहतेनें आणि अव्रूनें लोकांत वागतां येत होतें त्यांत व्यत्यय येऊन तो पराधीन झालाच समजा. जसजशी तो आपणास पराधीनपणाची संवय लावून घेतो, तसतशी त्याचे पायांत कर्जशत्रूची चांदीची शृंखला घट्ट बसत जाते. दक्षिण अमेरिकेच्या अरण्यांत एक प्रकारचा सर्प आढळतो तो फार भयंकर असतो. तो आकाशांत आनंदानें स्वेच्छेनुरूप उडणाऱ्या पक्ष्यांकडे सहज नजर फेंकतो. त्यांची व याची नजरानजर झाली कीं तीं पांखरें चित्रलिखित होतात, आणि त्याचेकडे आपोआप येऊं लागतात. त्या सर्पाचे श्वासोच्छ्वासाचा नुसता वारा त्यांचे आंगावर पडूं लागला कीं त्यांना त्याचें विष बाधूं लागतें आणि तीं बिचारीं खालीं पडून तडफडूं लागतात. त्या सर्पानें एकदां वेंटाळें घातलें ह्मणजे त्या पाखरांचा अगदीं चुराडा होतो, आणि शेवटीं तीं त्याचे मुखकंदरांत नाहींशीं होऊन जातात. ह्या माझ्या दाखल्याची हेळसांड करणें असेल किंवा त्याचें सार काय आणि त्यांत तथ्य किती आहे याचा विचार न करतां उगीच उडवाउडवी करणें असेल तर माझ्या शब्दांकडे लक्ष देण्यांत अर्थ नाहीं. तुमचे माझे विचार जुळावयाचे नाहींत. माझे रीतीप्रमाणें तुमचे हातून संपत्तीची व्यवस्था होणार नाहीं. त्यावद्दल उगीच श्रम करण्यांतही कांहीं हांशील नाहीं. ह्मणून तुह्मीं आपले मार्गानें जावें. तुह्मीं धरलेला क्रम तुह्मांस आज चांगला गोडच वाटणार. परंतु माझे शब्दांत कांहीं खरेपणा वाटत असेल आणि तुह्मांस असें वाटत असेल कीं, हा ह्मणतो हें रास्त आहे तर पैशाचा चांगला व्यय करून सुखसंपादन करण्याकरितां कर्जापासून अवश्य लांब रहा. जर तुह्मी असें ह्मणाल कीं, ही गोष्ट आह्मांला कबूल आहे इतकेंच नव्हे, पण पैशाचा सद्व्यय हेंच स्वातंत्र्याचें आणि सुखाचें उत्पत्तिस्थान आहे, तर मी ह्मणतों त्याप्रमाणें चालण्याचे

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

तुह्मी श्रम करा. त्या मार्गानें दृढ निश्चयानें गेलां तर तुह्मी खचित मान्यता मिळवाल, आणि वैभव आपोआप तुमचे पुढें येऊन उभें राहील.

एखाद्या तरुण मनुष्याला एकदां कर्ज काढून मौज मारण्याची संवय लागली ह्मणजे त्याची अवस्था वर सांगितलेल्या दक्षिण अमेरिकेंतल्या सर्पाचे मुखांत पडणाऱ्या पक्ष्यासारखी होते. जो तरुण एकदां कर्जाच्या सपाट्यांत सांपडला असेल तो आह्मीं वर लिहिलेलीं वाक्यें वाचून सुस्कारा टाकील आणि ह्मणेल कीं, कर्जाच्या सपाट्यांतून दूर रहा ह्मणून सांगणें सोपें, परंतु तसें करणें फार दुर्घट आहे. कारण दक्षिण अमेरिकेंतील सर्पाच्या दृष्टीनें वेधलेल्या पक्ष्यासारखी याची स्थिति झालेली असते. एकदां तरुण मनुष्य कर्जरूपी शत्रूच्या डावांत सांपडला ह्मणजे जसा पक्षी सर्पाकडे ओढवून त्याच्या श्वासोच्छ्वासानें गलित होऊन तडफडून शेवटीं प्राणास मुकतो, तशी दिवसानुदिवस त्याची गति होत जाते.

गोष्ट खरी; कर्जापासून दूर रहाणें फार कठीण खरें; परंतु ह्या जगांत प्रयत्नाशिवाय साध्य अशी कोणतीही वस्तू नाहीं. आपल्यापुढें भोजनाचें ताट वाढून ठेविलें असलें तरी त्यांतील अन्न तोंडांत जाऊन शरीरपोषणास उपयोगी होईपर्यंत आपणास मेहेनत करावी लागते. कोणतीही व कितीही आवडती वस्तू असली तरी ती उपयोगांत आणण्याकरितां मेहेनत केलीच पाहिजे. पुष्पशय्येवर विश्रांति घेणारास देखील शय्येवर जाईपर्यंत थोडे बहुत श्रम करावे लागतात. जसें दृश्य वस्तूला आकार, प्रमाण, व अस्तित्व असतें त्याप्रमाणेंच तिचे संपादनार्थ श्रमही तिचे मागें लागलेच आहेत.

आतां मी पुढें जी हकीगत सांगणार ती नीट मनःपूर्वक वाचून पहा, आणि मग करण्यापेक्षां बोलणें सोपें कीं काय याचा विचार करा. माझ्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यांत सुख जास्ती कीं तुमच्या मार्गानें सुखसंपादन जास्ती याचा तुह्मीच विचार करा. उपदेश करण्यांत मला मुळींच फायदा नाहीं; उलट त्रास आहे. शिवाय कोत्या विचाराचे लोकांकडून थट्टा करून घेण्याचा मात्र संभव जास्ती. परंतु माझे ह्मणण्याप्रमाणें वागण्यांत तुमचा चिरकाल फायदा आहे असें मला वाटतें. मी सांगतों त्याप्रमाणें

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

तुह्मी कर्जापासून दूर न राहिलां तर तुमचे मनाला स्वस्थता राहणार नाहीं; रात्रंदिवस काळजीरूपी वाळवी अंतःकरण कोरील. कर्जदाराचें स्वरूप नेहमीं तुमच्या नजरेसमोर राहील आणि एकामागून एक नीच मार्ग तुह्मांला सुचूं लागतील. कर्ज काढतेवेळीं कांहीं वाटत नाहीं, परंतु कर्ज फेडण्यास अडचण पडूं लागली ह्मणजे कर्जदाराला टाळावें, खोटें बोलावें, खोटे दस्त-ऐवज करावे, किंबहुना चोऱ्या कराव्या. चोरींत पकडले जाऊं या धास्तीनें लुटारू लोकांचे टोळ्यांस मिळावें, जंगलांत रहावें, वाटसरू लोकांचे खून करावे असे प्रसंग अनेक वेळां घडून येतात.

आपणच ह्मणतों कीं, पांच वर्षांमागें अमुक मनुष्य काय चांगल्या स्थितींत होता आणि आतां कोठें आहे! तर विनभाड्याचे घरांत!! अमुक गृहस्थाचें घर शून्य कां हो! चार वर्षांमागें त्याचे देवडीवर हजारों माणसांची गर्दी असे, त्याचा थाट पाहून तर आमचे डोळे दिपून जात, त्याच्यासारख्या गाड्या घोडे राजाचे येथें देखील दिसणें कठीण; तो आतां कोठें आहे? तो बिचारा तोंड काळें करून **दमणला** गेला कीं **पोंदेचरीला** गेला कोण जाणे. शेंकडो व्यापारी लोक त्याचा शोध करीत आहेत पण पत्ता नाहीं. त्याणें केलें तरी काय? तो पळाला. अहो त्याला पळण्याची कां बरें बुद्धि सुचली!! अहो त्याला असा कोणीं सल्ला दिला? त्यालाच विचारा. त्याची तुमची गांठ पडली तर तुह्मी त्याला ओळखणार सुद्धां नाहीं. भरज्वानींत असतां त्याचा चेहरा फिकट झाला, गालांना सुरकुत्या पडल्या, सर्व केंस पांढरे झाले, शरीर कृश झालें. अहो राव! तुह्मी आपला गांव सोडून कां निघालां? बिचारा काय उत्तर देतो. "मीं उत्पन्नापेक्षां खर्च जास्ती केला तेव्हां कर्ज काढणें प्राप्त झालें. कर्जांतून सुटका होण्याचा मार्ग राहिला नाहीं, कर्जदारी लोक येऊन धरणें घेऊं लागले, आणि न जाणों तुरुंगांत नेतील या धास्तीनें पळून आलों. मला तोंड दाखविण्यास जागा नाहीं. कदाचित् येथेंही धरून नेण्याकरितां येतील ही रात्रंदिवस काळजी. थोडासा काळजीचा विसर पडावा ह्मणून मी दारू, गांजा इत्यादि मादक पदार्थांचें सेवन करितों, परंतु त्यासही आतां पैसे नाहींत. आतां मरण

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

येईल तर बरें, ह्मणजे एकदां सुटेन." असे त्याचे तोंडचे उद्गार ऐकून माझे डोळ्यांतून टिपें पडतात. चार वर्षांपूर्वी राजेरजवाडे देखील त्याचे दाराशीं खेपा घालीत. त्याची प्रकृति जरा बिघडली कीं हजारों लोक चौकशी करीत. त्याचे मुलाचें लग्न झालें तेव्हां त्याचें घर काय इंद्रभुवन बनलें होतें आणि आतां त्याची ही दशा !!!

कर्जापासून दूर रहाणें सोपें नाहीं. खरोखर फार कठीण आहे, यांत संशय नाहीं. आज तुमचेजवळ दोन पैसे आहेत, ह्मणून व्यापारी माल आणतो, आणि ह्मणतो, महाराज! याचा आपण माझेसाठीं उपयोग करावा. शेटजी आज हातासीं पैसा नाहीं ह्मणून तुमचें कापड मला नको. काय महाराज! हें काय ह्मणतां, आपणाजवळ पैसा मागतो कोण? मी कधीं येतों पैसा मागण्याकरितां? माझा माल आपण वापरतां इतक्यानें मी कृतकृत्य झालों असें समजतों. हे गोडगोड शब्द ऐकून अविचारानें तुह्मी खूप खरेदी करतां; तुमचें जमिनीचें उत्पन्न आणखी सहा महिन्यांनीं तुमचे हातीं येणार ह्मणून आज तुह्मांला एखादी ऐषआरामाची जिन्नस घेतां येत नाहीं; अमका चंदेरी दुपेटा किंवा अमका दुशाला आज घेऊन कोणास बक्षीस देतां येत नाहीं, परंतु ज्यास बक्षीस द्यावयाचें तो तर आणखी दोन दिवसांनीं जाणार. तो आपली कीर्ति काय गाईल? तो ह्मणेल कीं, अमुक गृहस्थ "देखनेमें ढब्बू आणि चलनेमे शिवराई" ही तुह्मांस काळजी पडते. तुमचे आसपास जी, ताज्या घोड्यावरच्या गोमाशांसारखी, मंडळी असेल ती ह्मणणार, रावसाहेब! काळजी कशासाठीं? आणखी सहा महिन्यांनीं आपलें उत्पन्न येईल; आज इतकी फिकीर कशाकरितां पाहिजे? एकजण पुढें होऊन ह्मणतो मी सर्व तजवीज लावतों, आणि तो जाऊन दोन तासांनीं एक अगदीं गरीब, दिसण्यांत जणूं काय वेडा असा मनुष्य बरोबर घेऊन येतो. उंदरावर झडप घालण्याकरितां जसें मांजर डोळे मिटून बसतें तसा हा तुमचे पुढें मोठे नम्रतेनें बसतो. तुह्मी विचारतां, कोणहो हा इतका सालस गृहस्थ? महाराज, हा फार सज्जन आहे, याचेजवळ थोडे बहुत पैसे आहेत, आणि ते आपल्या सारख्याचे उपयोगीं पडतील तर स्वतःला धन्य

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

समजेल. तुह्मी विचारतां, त्याची कबुलायत काय, कोणते शर्तीवर पैसे देईल? उत्तर मिळतें कीं, महाराज आपल्याजवळ कबुलायत कसली? फक्त एक बोटभर चिठ्ठी; तीही रावसाहेबांस लिहिण्यास श्रम पडत असेल तर कांहीं जरूर नाहीं. नाहीं नाहीं, असें कां, आह्मी सहा महिन्यांनीं रुपये आले ह्मणजे देणारच, मग अडचण कसली? कोणता पाहिजे तो दस्तऐवज लिहून देऊं असें म्हणून भरभर दस्तऐवज खरडून देतां. त्या वेळीं तुमचे लक्ष्यांत येत नाहीं, कीं तुह्मी आपले मोकळे हातांत व्यर्थ खोडा घालून घेतां; केवळ नादीपणानें छातीवर कर्जरूपी धोंड दडपून घेतां. रुपये घेऊन तुह्मी अनेक प्रकारचे कपडे वगैरे खरेदी करून बक्षीस देऊन टाकतां. आतां मार्ग खुला झाला. कर्ज काढण्याचा प्रारंभ करण्यापूर्वीं मनाला किंचित् शंका वाटे. ह्या दिलावर रावसाहेबांस कोणी येऊन सांगतो कीं, अमुक शहरची फार उत्तम गाणारीण आली आहे. मग काय उशीर? रावसाहेब हुकूम करितात कीं, आज रात्रौ गाणें झालेंच पाहिजे. पांच पन्नास मंडळीला आमंत्रणें होऊन बडा थाट होतो. वेश्या तर 'हसंति च रुदंति च वित्तहेतोः.' त्या पैसा मिळविण्याकरितां अनेक ढोंगें करितात. रावसाहेबांची मर्जी संपादन करण्याकरितां आलेली गणिका पाहिजे तसा वर्तनक्रम ठेविते. एखादे प्रसंगीं अशी बतावणी करिते कीं, मी अमुक गांवीं जाणार आहें, पण काय करूं! दागिने चांगले नाहींत, हातांत गोटतोडे नाहींत. कांहीं लाज राखाल तर पहा, मी आल्यावर दागिने परत देईन. आमचे रावसाहेब व्यर्थ दांभिकपणाचे पाशांत सांपडल्यामुळें कर्ज काढून आपली अब्रू राखण्याकरितां दागिने देतात. घरीं मेजवान्यांवर मेजवान्या होतात. त्यांतही अनेक प्रकारचे पदार्थ दामदुप्पट किंमतीनें आणवून मंडळीला संतुष्ट करितात. सदोदित विचार हाच कीं, आपलें जहागिरीचें उत्पन्न आलें ह्मणजे या सर्वांची फेड करून टाकूं. हंगामी उत्पन्न येण्याचे वेळीं सर्व घेणेकरी लोक येतात. हिशोब झाला ह्मणजे दिसून येतें कीं उत्पन्नापेक्षां कर्ज जास्ती झालें. सर्व कर्जदारांस थोडथोडे पैसे देऊन उलगडा होतो. एकदां चैनीची संवय लागली ती सुटत नाहीं.

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

खर्चाचें तोंड मोठें होत जातें, उत्पन्न आहे तेंच रहातें. होतां होतां सालिना जमेची रक्कम कायम राहून उधारीची रक्कम वाढत जाते. इतक्यांत घरीं कांहीं लग्नकार्य निघालें ह्मणजे सर्वच आटपलें! सोयरेसंबंधी त्रास देऊं लागतात कीं, आपले नांवलौकिकाप्रमाणें लग्न झालेंच पाहिजे. यजमानास कर्ज काढण्याशिवाय दुसरा उपाय राहिलेला नसतो. कर्ज न काढावें तर आज अब्रू जाते. पण कर्ज देतो कोण? ज्या लोकांस पूर्वी अनेक प्रकारें संतुष्ट केलें आणि जे नेहमीं तोंडपुजेपणानें अष्टौप्रहर रावसाहेबांचे बिछायतीवर पडून रहात असत ते आतां तोंड दाखवीत नाहींत. रावसाहेबांची कदाचित् गांठ पडलीच तर तोंड फिरवितात. आतां पैसे तर पाहिजेत पण ते कोणी देत नाहीं. तेव्हां गुपचूप रावसाहेब जमीन गहाण टाकतात. मुदतीप्रमाणें कर्ज न फिटलें ह्मणजे गहाणदार जमीन घेतो. तितक्यानेंही पुरें न पडलें तर घरादाराचें लिलांव होतें. बिचाऱ्या फंदी रावसाहेबांचे संसाराची वाताहात होते. मनाला अपरिमित खेद होतो. शरमेनें आणि काळजीनें शरीरप्रकृति खराब होते. सर्वस्वी त्यांचा नाश होतो.

अरे! तूं गरीब आहेस काय? तुझे नांवाला कोणतेही प्रकारचा डाग नाहींना? आज शहरांत तुझी इतकी पत आहे कीं, नुसते तुझे नांवावर थोडीबहुत रक्कम मिळेल. पण तूं आपले नांवावर कर्ज काढलेंस कीं, तुझें नांव गहाण पडलें समज. तुझे नांवाला मोल नाहीं, पण त्यावर तूं जें कर्ज काढशील तें क्षुल्लक असलें तरी तें योग्य वेळीं परत न गेलें तर तुझे नांवाची काय स्थिती? ज्याच्यावर त्वां कर्ज काढलेंस त्याची किंमत झाली. तूं गरीब अस, किंवा नगरशेटचा मुलगा अस, पण एवढी गोष्ट लक्षांत ठेव कीं ज्या वाह्यात्कारी वेडगळ मनुष्यानें तुला ह्मटलें कीं 'आपण आमचे जवळून पैसा घेतला ह्मणजे मी कृतकृत्य झालों' त्याचेपासून दूर रहा. त्याला एकवार नको ह्मटलेंस कीं सर्व ठीक होईल. त्या वेळीं तुला कदाचित् असें वाटेल कीं, मीं त्याचे पैसे न घेतले तर कसें होईल? माझी अडचण कशी दूर होईल? गोष्ट खरी. त्या वेळीं थोडासा क्लेश होईल, अडचण सुद्धां पडेल, पण पुढें जे प्रसंग येतील त्यांपासून तर बचाव होईल.

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

शिवाय पोक्त विचार करून जर आपली शरीरप्रकृति चांगल्या रीतीनें संभाळलीस तर तत्संबंधी तुझा हेवा करणारे लोक सांपडतील. कितीएक लक्षाधीश तुला हजारों रुपये देऊन जर साधलें तर तुझी शरीरसंपत्ति मिळविण्याची अपेक्षा करीत बसतील. शरीर निरोगी तर तूं पाहिजे ते श्रम करून पैसा मिळवूं शकशील.

ह्या जगांत कांहीं गोष्टी अशा आहेत कीं त्यांचा थोडा बहुत विचार केला ह्मणजे पुढें अक्कल चालत नाहीं. **सर ऐझ्याक् न्यूटन्** यानें निश्चित केलें कीं, गुरुत्वाकर्षणशक्तीमुळें फळ झाडावरून खालीं पडतें. आपण सगळे तें कबूल करितों. पण कोणीं असा प्रश्न केला कीं, गुरुत्वाकर्षणशक्तीचें कारण काय? तर कांहीं उत्तर नाहीं. तशाच गोष्टी मनुष्याचे संसारांतील वागणुकीबद्दल आहेत. किबहुना तत्संबंधीं कांहीं अशा बाबती आहेत कीं, जितका त्याविषयीं आपण जास्ती वादविवाद चालवूं तितके आपण मुद्यापासून दूरच राहूं. प्रत्येक वादांत पूर्वपक्ष उत्तरपक्ष आहेतच, आणि वाद करणारांची प्रतिपादनशक्ति असेल त्या बेतानें बहुतकरून परिणाम होतो. ह्मणून प्रत्येक मनुष्याला कितीएक गोष्टींचा कांहीं दिवसपर्यंत (ह्मणजे जगाचा चांगला अनुभव येईपर्यंत) वादविवाद करणें हितावहच नाहीं. आह्मीं राजाला श्रेष्ठ मानावें, त्याची आज्ञा उल्लंघन करूं नये, किंवा फौजेचे दरएक शिपायानें आपले अंमलदाराचा हुकूम विनतक्रार मानिला पाहिजे. या गोष्टीचे दोन्ही पक्ष होऊं शकतात. परंतु ह्या गोष्टी स्वतः प्रमाण आहेत असें समजून प्रत्येकजणानें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. तद्वतच मी जरी स्वेच्छाचारी स्वतंत्र आहें तरी माझे वागणुकीचे नियमांबद्दल वाद चालविणें मी रास्त समजत नाहीं. कितीएक नियम चांगलेच आहेत असें गृहीत धरल्याशिवाय माझें या जगांत चालणार नाहीं असें मी समजतों. माझे मुद्दे कच्चे आणि मी वाद चालविला तर ते खोटे ठरतील यामुळें मी वादास पुढें धजत नाहीं असें नव्हे, परंतु कदाचित् माझेपेक्षां प्रतिपक्षी वादकौशल्यांत जास्ती निपुण असला तर उगाच माझे मनाचा दृढपणा नाहींसा होईल यास्तव मी वादापासून दूर राहतों. नास्तिकमत स्थापन

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

करणें, परमेश्वरी कृत्यांत चुक्या काढणें वगैरे अनेक बाबतींविषयीं ग्रंथांचें ग्रंथ लिहिलेले आहेत. तथापि परमेश्वर नाहीं, किंवा इमान ह्मणजे केवळ बाह्यात्कारी ढोंग, असें सिद्ध करून देणारे पुष्कळ वादी मिळतात; ह्मणून तो वाद ग्रहण करून चालणें कधींही प्रशस्त नाहीं हें कोणी पाहिजे तो कबूल करील.

तुह्मी गैर अनुभवी भरतारुण्यांत आलेले असून थोडक्याच काळांत संसारसागरांत अप्रतिबंध पोहूं लागाल त्या वेळीं तुमचे वाडवडिलांनीं व हितचिंतकांनीं ज्या गोष्टी तुह्मांस लहानपणापासून त्याज्य ह्मणून सांगितल्या आहेत त्यांविषयीं वाद न चालवितां कांहीं दिवस तरी ग्रहण करून चाला. तुमचे शिक्षकानें आज तुह्मांस सांगितलें, कीं शिवाजी इ. स. १६२७ या वर्षी जन्मला, किंवा एक पैशाचे तीन आंबे तर चार पैशांचे बारा, हें तुह्मी विनतक्रार कबूल करितां; सदोदित त्याप्रमाणें सर्व हिशोब करितां आणि त्या हिशोबाची सत्यता पुढें तुमची तुह्मांला कळूं लागते. त्याप्रमाणेंच पैशाच्या व्यवस्थेविषयीं मीं ज्या कितीएक गोष्टी वर सांगितल्या व पुढें सांगेन त्या प्रथमारंभीं स्वीकारून कांहीं वर्षें तरी वर्तन ठेवा; त्यांची योग्यता तुह्मांलाच पुढें कळून येईल. आज त्यांजबद्दल तुह्मीं वाद न चालवितां कदाचित् त्या नियमाप्रमाणें न चालतां चूक केली तर त्याचा तुह्मांस पश्चात्ताप होईल आणि तुह्मी ताळ्यावर याल. परंतु एकदां तुह्मी वाद सुरू केलात आणि तुह्मांला कोणी मतलबी पण चांगला वाद करणारा मिळाला तर तुमची बुद्धि चंचल होईल आणि त्यापासून पुढें होणारे अनिष्ट परिणाम तुह्मांला भोगावे लागतील. उदाहरणार्थ, तुह्मी आपले दौलतीची व्यवस्था पाहूं लागलां ह्मणजे पुष्कळ लोक तुमचे जवळ येतील, त्यांत प्रत्येकाचे निरनिराळे हेतू असणार, तुह्मी तर जगाचे गैरमाहित, आणि ही तर आणीबाणीची वेळ. तऱ्हे-तऱ्हेच्या मधुर भाषणानें खुषामती लोक तुह्मांस हरभऱ्याचे झाडावर चढवितील, तुमच्या मोठेपणाचें गुळचट वर्णन करून तुमचें मन दंग करून टाकतील, तुह्मांस नाच, बैठकी, तमाशे, मेजवान्या

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

अनेक तऱ्हेचे पोरकट खेळ, जसें पांखरें उडविणें, पतंग लढविणें, जुगार खेळणें इत्यादिकांचा नाद लावून आपलें कार्य साधून घेतील. एकादे वेळीं तुमच्या मनाचा कल पाहून ते तुह्मांस असें ह्मणतील कीं, महाराज फलाणी खबुतरांची जोडी किंवा फलाणा बटेरा किती चांगला आहे ह्मणून सांगूं, पाहिजे त्याजबरावर लढविला तरी हार जाणार नाहीं. तुह्मी तर छंदी, तेव्हां त्या जनावरांची किंमत देऊन घ्याल इतकेंच नाहीं, पण ज्यानें तीं जनावरें तयार केलीं असतील त्यासही वस्ताद वस्ताद ह्मणून आश्रय देणार. तोही काय विचारतां, आपला स्तुतिपाठ करून आपणांस चढविणारच. होतां होतां गोष्ट कोणते थरावर जाईल याचा कांहीं नियम नाहीं. खबुतरबाज, पतंगवाले वगैरे लोक निशाबाज असतात. आरंभीं उगीच बाहेर दाखविण्यापुरती ते तुमची मर्यादा ठेवून चिलिमीचा झुरका मारण्याकरितां किंवा एखादा प्याला झोंकण्याकरितां दरवाज्याआड होतात. तुमचें कधीं जरा कपाळ दुखलें किंवा ज्वर आला कीं, परपिंडलोलुप सेवक यांचें साधलें. तुह्मी पलंगावर पडून असलां ह्मणजे एक पायाशीं बसेल, दुसरा डोक्याशीं बसेल, तिसरा वारा घालील, आणि ते एकमेकांशीं गोष्टी काढतील कीं, फलाण्या देवळांत एक साधु आला आहे, त्याचा आंगारा आणिला, कीं यजमानांचें कपाळ लागलेंच राहील. पण त्याचा होमहवनाचा खर्च पन्नास रुपये पडतो. दुसरा ह्मणतो, इतके रुपये आणा कोठून? तिसरा ह्मणतो, वः यजमानांकरितां मी स्वतःला गहाण टाकीन पण आंगारा आणीन. यजमानास वाटतें कीं, याची माझेवर निःसीम भक्ती दिसते, ह्मणून तो समाधान मानून त्या सेवकाला पन्नास रुपये देतोच आणि शिवाय कांहीं बक्षीस. आंगारा आल्यावर काकतालीयन्यायानें आराम झाला कीं मग काय विचारतां, साधूचें पोंग वाढलेंच, आणि आमचे यजमान त्याचे दासानुदास बनलेच. मग तो साधु आणि त्यास आणणारे सेवक ह्मणतील ती पूर्व दिशा. ह्मणून चाकर नोकरांस वागविणें व त्यांचा उपयोग करून घेणें यांत फार खबरदारी ठेविली पाहिजे.

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

कितीएक ऐतिहासिक कारणांनीं गाणें वजावणें चांगले लोकांतून नाहींसें होऊन निकृष्ट स्थितीच्या लोकांत राहिलें आहे. ज्या लोकांनीं आतां त्याचा अभ्यास ठेविला आहे त्यांपासून तुमच्यासारख्या संसारसागरांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या तरुण गृहस्थांनीं अगदीं दूर राहिलें पाहिजे. स्मशानांतील पुष्पें कितीही सुगंधी असलीं तरी तीं जशीं त्याज्य आहेत, त्याप्रमाणें ह्या वर्गांतील लोकही समजावे. गाणें किंवा वाजविण्याची कला ही वाईट असें मीं ह्मणणें नाहीं, परंतु ज्यांचेजवळ ती आतां राहिली आहे ते लोक बहुशः वाईट हें लक्षांत ठेवा. कांहीं योग्य प्रसंग काढून तुह्मांस त्याची अभिरुचि लावण्याचा प्रयत्न करण्यास तुमचे घरांतील पंक्तीबारगीर कधींही चुकणार नाहींत. मीं वर सांगितलेंच आहे कीं कोणतेही विषयाचा पूर्वपक्ष उत्तरपक्ष करीत वसलें ह्मणजे पाहिजे तो पक्ष सिद्ध करितां येईल. कोणते तरी निमित्तानें गाणारीण रोज येऊं लागेल; तुह्माला प्रथम किंचित् अवघड वाटेल, पण तुह्मी आपले मनाचें समाधान कराल कीं, मी गाणें कशाकरितां करवितों आहें; आपले शरीरप्रकृतीकरितां, किंवा मनरंजनाकरितां, यांत कोण काय ह्मणणार आहे. होतां होतां त्या वेश्येचा तुमचे घरीं येण्याचा रिवाज पडतो, आणि इतर आश्रितजनांप्रमाणें तीही येऊं लागते. मग तुमचे मतलबी अनुयायी अनेक मार्गानीं तुह्मांस तिचे नादीं लावण्याचा प्रयत्न करूं लागतात, व बहुतकरून विजयीही होतात. एकदां तुह्मी त्या मार्गाला लागलेत ह्मणजे शहरांतील कुलटांविषयीं बोलत बसून माहिती मिळविण्याची तुह्मांस गोडी लागते. ही गोडी लागली ह्मणजे त्या तऱ्हेचे लोक तुमचे घरीं नानाविध कारणांनीं जमूं लागतात. या लोकांचा सहवास वाढला म्हणजे त्यांच्या सर्व संवयी थोडेच दिवसांत तुम्हांस लागतात यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. मग दारू म्हणूं नका, भांग ह्मणूं नका, गांजा ह्मणूं नका, सर्व प्रकारचीं दुर्व्यसनें तुह्मांस लागतात. प्रारंभीं लोकलज्जेस्तव अशा पदार्थांचें तुह्मी अनेक निमित्तांनीं रात्रौ सेवन करूं लागतां; तुह्मी ह्मणतां हवेंत गारठा फार आहे, कांहीं उष्ण पदार्थ पाहिजे, आज भूक चांगली लागली नाहीं, थोडेंसें मद्य प्राशन करून मग भोजन

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

करूं; आज काय आमचे मित्र आले आहेत तेव्हां त्यांचे बरोबर प्याले-बाजी झालीच पाहिजे अशा अनेक सबबींनीं हा तुमचा क्रम सुरू होतो. तुह्मी चोरून लपून या मार्गाचा प्रारंभ करितां एवढ्यावरूनच तो निंद्य आहे असें होत नाहीं काय? हळूहळू तुह्मी या व्यसनाच्या इतके आधीन होतां कीं, अहोरात्र तुह्मी त्यांत चूर. तुह्मीं व्यसनी बनलां ह्मणजे अर्थातच तुमचे चाकर मंडळीची पोळी पिकली. ज्या दिवशीं आपला मतलब साधणें असेल त्या दिवशीं तुह्मांस दोन प्याले भरून दिले कीं झालें काम. मला एका जहागिरदाराची हकीगत माहीत आहे ती तुम्हांस सांगतों. त्याचें सालीना उत्पन्न सुमारें वीस लक्ष रुपयांचें आहे. पंधरा वर्षांपूर्वी तो फार मिताहारी व सदाचरणी होता, त्यावेळीं त्याचेमध्यें म्हणण्यासारखें व्यंग नव्हतें. जवळ तोंडपुजी मंडळी मात्र बरीच होती; त्याची त्याला परीक्षा होत नसे. त्यांनीं प्रथम त्याला गाण्याचा नाद लाविला, नंतर थोडक्याच दिवसांत सुरापानं सुरू झालें. आतां त्या जहागिरदारानें आपली सर्व व्यवस्था पाहाण्याचें सोडून देऊन तो नेहेमीं वेश्यामंदिरांत असतो. पंधरा वर्षांपूर्वी त्याचेजवळ पांचपन्नासलक्ष रुपये शिल्लक होते. ते सर्व जाऊन उलटें आज तितकेंच आणखी कर्ज झालें आहे. त्याचे मतलबी कारभाऱ्यांस कांहीं काम साधून घेणें असेल तर त्याबद्दल यजमानाचा हुकूम ते प्रातःकाळीं घेत नाहींत. सायंकाळीं तो ऐन रंगांत असेल त्यावेळीं संधी राखून आपलें काम करून घेतात. त्यांचें प्रत्यहीं आचरण ह्मटलें तर मनास वाटेल तसें कुळांला गांजून पैसे काढणें, चोऱ्या करविणें, लांच खाणें वगैरे. सुदैवानें त्या जहागिरदाराचे फिरून डोळे उघडले तर त्यास त्याची पूर्वीची शिल्लक, व जाहागिरीची आबादानी परत आणण्यास आतां निदान पन्नास वर्षें तरी पाहिजेत. याचें कारण काय ह्मणाल तर मालक दुर्व्यसनी बनून आपलें हिताहित पाहीनासा झाला इतकेंच. दुर्व्यसन व संसाराचे व्यवस्थेकडे दुर्लक्ष, यामुळें ही जर लक्षाधिपतीची व्यवस्था तर त्यांपासून साधारण प्रतीचे लोकांची काय दशा होईल याचा तुह्मीच विचार करा.

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

वरचा सर्व प्रकार एवढ्या विस्तारानें सागण्याचा हेतु इतकाच कीं, या गोष्टी तुह्मीं निरंतर चांगल्या मनांत वागवाव्या. कोणत्याही वस्तूचा प्रारंभीं निषेध करून मनोनिग्रह करणें कडू वाटतें ही गोष्ट खरी, परंतु जसें औषध घेतेवेळीं कडू लागतें पण त्यापासून होणारा फायदा फार महत्वाचा असतो तसेंच प्रारंभीं कोणत्याही मोहक पदार्थाचा निषेध करणें कडू वाटेल, पण त्याचा परिणाम चांगलाच होईल. आज तुह्मांला एखादी ऐषआरामाची जिन्नस, उदाहरणार्थ "नवीन प्रकारच्या वाज्याची पेटी" पाहिजे, परंतु हाताशीं पैसे नाहींत; लोक सांगतात कीं, "कर्ज काढा आणि हौस पुरवून घ्या, आज हौस पुरविणें नाहीं तर केव्हां?" लोकांचें काय जातें! आज तुह्मांस भर दिली, आणि तुमचे मनासारखा प्रकार झाला कीं तुह्मी खूष. उद्यां कर्ज फेडण्यास तुमचे हातीं पैसे नसले ह्मणचे तेच लोक तुमची उलटी थट्टा करतील कीं, आह्मीं पाहिजे तें ह्मटलें, आम्हीं त्यास विहिरींत उडी टाकण्यास सांगितलें पण त्या मूर्खानें कां ऐकावें? त्यानें उडी कां टाकावी? त्याचे हौसेसाठीं त्यानें कर्ज काढिलें, असे अनेक उद्गार कानीं येतील. हे सर्व विचार सदैव मनांत बाळगून जर तुह्मी कधींही कर्ज काढणार नाहीं, हौस आंवरून धराल, वेळ पडल्यास अडचणही सोसाल, प्रसंगीं जास्त मेहेनत कराल तर मी खचित सांगतों कीं, तुमचें आयुष्य समाधानांत जाईल.

आतां तारुण्यांत एक धास्ती असते. कदाचित् तुह्मी आपलेसाठीं कर्ज काढणार नाहीं परंतु तुमचा कोणी परमस्नेही अडचणींत सांपडला आणि त्याला पैशाची गरज लागली ह्मणजे तो तुमचे जवळ येऊन तुम्हांस ह्मणतो, कीं माझेसाठीं तुह्मी जामीन रहा; ह्या तीन महिन्यांचे मुदतीचे दस्तऐवजावर सही करा. तुह्मीं आपले स्नेहाला मदत करूं नये असें माझें मुळींच म्हणणें नाहीं. पण मदत करण्यापूर्वी चांगला विचार करा. जामीन रहाणें ह्मणजे ऋणकोनें पैसे न दिले तर तुह्मीं दिले पाहिजेत. लागतील त्या वेळीं जामिनगिरीचे पैसे देण्याचें सामर्थ्य तुमच्यांत असलें तर चिंता नाहीं. तुमचा स्नेही तुह्मांस फसविण्याचे उद्देशानें आला असें मी बिलकुल समजत नाहीं. परंतु या संसारांत एका क्षणांत कसे प्रसंग येतात याचा सुमार नाहीं. तुमचे स्नेह्याचें शे-

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

तभात आहे आणि त्याचे जोरावर त्यानें कर्ज काढिलें. आतां धनको जामीन मागतो याचें कारण काय वरें ? तें इतकेंच कीं, तुमच्या स्नेह्याचें उत्पन्न वक्तशीर येईल कीं नाहीं, ही त्याची खात्री नाहीं; ही जर खात्री त्याची नाहीं तर तुमची तरी कां असावी ? तुमच्या स्नेह्यावद्दल जर जामीन रहाणें तर ज्या रकमेसाठीं तुह्मी जामीन रहाल ती अष्टौप्रहर तुमचे घरांत असली पाहिजे. तुह्मी ज्या मनुष्यासाठीं जामीन रहाल त्याची योग्यता स्वतःपेक्षां तुह्मांस जास्ती असेल तर तुह्मी जामीन रहा, किंवा जितकी रक्कम असेल ती एकदम देऊन टाका. स्नेह्यास तुह्मीं मदत करूं नये असें मी ह्मणत नाहीं. तुमचे जवळ पैसा असून जर तुह्मीं प्रसंगीं योग्य ठिकाणीं आपल्या स्नेह्यासाठीं त्याचा व्यय न केला, तर असला पैसा तरी बाळगून काय उपयोग ? आज तुह्मांस पैसा देण्यास सवड नसून तुह्मी जामीन राहिलां तर तुह्मीं धनकोला फसविलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. जो पैसा देऊन टाकतो तो उदार खरा, परंतु अडचणीच्या वेळीं रक्कम उसनवार देतो तोही उदार. स्नेह्याला रक्कम उसनवार देणें ती असें समजून द्यावी कीं, ती रक्कम गेली तरी कधींही आपणांस हरकत येणार नाहीं. तुम्हीं दूरवर नजर पोहोंचविली तर तुमची अशी पक्की खात्री होईल कीं, पैसा उसनवार देण्यापेक्षां अगदीं देऊन टाकणें फार प्रशस्त आहे. निदान तुमच्या मनाची तरी अशी पक्की खात्री असली पाहिजे कीं, जी रक्कम मीं दिली आहे ती परत घेण्याची आशा ठेवून दिली नाहीं. ज्या स्नेह्याला पैसा द्याल त्याला असें सांगा कीं, जर रक्कम परत दिलीस तर ती मी खुषीनें घेईन, परंतु आपणा दोघांत कधींही विरोध येऊं नये ह्मणून मी असेंही सांगतों कीं, रक्कम परत करण्यासाठीं स्वतः त्रास करून घेऊं नको. तुह्मांजवळ शिल्लक असल्यास पाहिजे तितका पैसा द्या. परंतु कोणासाठीं दस्तऐवजावर आपली सही करूं नका. पैसा गेला तर फिरून मिळवितां येईल. नांव एकदां गेलें तर फिरून मिळणार नाहीं, ज्याचें नांव चांगलें आहे तो अब्रूदार. तो जरी गरीब असला तरी चिंता नाहीं. परंतु संपत्ति असून नांवाला बट्टा लागला तर त्या मनुष्याची जगांत काय योग्यता असते तें तुमच्या नजरेस येई-

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

लच. तुह्मी चार मंडळींत बसलां असाल त्या वेळीं जर मारवाड्यानें तुह्मी ज्या रकमेसाठीं जामीन राहिलां असाल ती मागितली तर तुमची कायगत याचा तुह्मी विचार करा. रक्कम तयार असली तर ठीकच, नाहींतर तावडतोब तुमची अब्रू जाईल. मीं फार पाल्हाळ लाविला आहे असें कदाचित् तुह्मांस वाटेल, परंतु तुम्हीं सर्वांनीं चांगले नांवालौकिकास यावें अशी माझी उत्कंठा आहे; म्हणून पैशासंबंधी तुह्मीं कसें वर्तन ठेवावें हें फोड करून सांगत आहें. पुष्कळ संभावित तरुण गृहस्थांच्या संसाराच्या प्रारंभीं झालेल्या चुक्यांनीं त्यांच्या आयुष्याची माती झालेली माझे ऐकण्यांत व अवलोकनांत आहे, ह्मणून मीं इतका पाल्हाळ लाविला.

मी असें समजतों कीं, आतां आपले दोन तीन मुद्दे ठरले; ते कोणते तरः—

१. कोणाचाही पैसा उसना काढून पुढें तो परत देण्यास अडचण येण्याचा यत्किंचित्ही संभव असेल तर कर्ज काढूं नये.

२. जी रक्कम वेळ आली असतां तुह्मी अगदीं देऊन टाकण्यास तयार नाहीं ती कधींही उसनी देऊं नये.

३. दुसऱ्याचें कर्ज आपण पाहिजे तेव्हां फेडूं अशी आपली पक्की खात्री असल्याशिवाय आपण कोणासाठींही जामीन राहूं नये.

या तीन गोष्टी तुह्मीं स्वीकारल्यास तुमचा एक मोठा फायदा होईल. तो असा कीं, तुह्मांस कोणत्याही प्रकारची मागें काळजी राहणार नाहीं. जें तुमचें धन असेल त्यावद्दलची तुह्मांस एकच काळजी राहील कीं आपले सुखाकरितां त्याचा योग्य खर्च करावा! याशिवाय दुसरा कांहीं विचार तुमच्या मागें राहणार नाहीं. कदाचित् तुमचें द्रव्य थोडें असेलें तरी तुह्मी कोणाचे आधीन नाहीं; तुमचे तुह्मी मुखत्यार आहां; पण कर्ज डोक्यावर असलें, किंवा कोणाची जामिनगिरी असली, ह्मणजे सदोदित त्यावद्दलची काळजीरूपी सुरी उरांत खोंचलेली असते.

तर तुह्मीं प्रत्येकानें आपआपली स्वतंत्रता हरतऱ्हेनें संभाळून ठेवावी. पुढें संसारांत काय करणें याचा चांगला शांतपणें विचार करावा. काय

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

करणें आहे हें ठरल्यावर तुह्मी तो हेतू संपादन करण्याला कितपत योग्य आहां त्याचा अंदाज केला पाहिजे. कोणींही अशी घमंडी बाळगूं नये कीं मी बुद्धिवान् आहें, पाहिजे तो उद्योग पत्करिला तरी करून टाकीन. कोणतेंही काम करण्यास दोन गोष्टींची जरूर आहे. बुद्धि पाहिजे तसेच श्रमही पाहिजेत. त्यांत एकनिष्ठेनें श्रम केले तर पुष्कळ कार्यें साध्य होतात, फक्त बुद्धीवर अवलंबून राहिल्यानें तीं होत नाहींत. शिवाय नशिबावर हवाला ठेवणें गैरशिस्त आहे. नशीब नेहमीं प्रतिकूल आहे असें समजून कोणत्याही कामाला हात घातल्यास तुह्मांस यश येण्याचा संभव जास्ती. कदाचित् यश न आलें तरी **"यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोऽत्र दोषः."** कोणत्याही कामांत यश येण्याकरितां उत्साह तर पाहिजे, परंतु त्याचेबरोबर दृढ निश्चय नसेल तर तें काम होणें नाहीं. ज्या मनुष्याचा दृढ निश्चय नाहीं तो कितीही बुद्धिवान् असला किंवा त्याचे आंगीं कितीही कौशल्य असलें तरी त्यानें हातीं घेतलेलें काम तडीस जाणें कठीण.

लक्ष्मी चंचल आहे, लोभ घारीसारखा आहे, व दूरदृष्टि कोल्ह्यासारखी आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. लोभ लांबून नानातऱ्हेच्या पदार्थांची अपेक्षा करीत असतो पण ते साध्य आहेत किंवा नाहींत याचा विचार करीत नाहीं. दूरदृष्टि कोणती एखादी गोष्ट साध्य आहे किंवा नाहीं याचा अगोदर चांगला विचार करणारच. जो मनुष्य श्रेष्ठत्व पावतो व चंचल लक्ष्मीला हस्तगत करून घेतो त्यास लोभ व दूरदृष्टि या दोहोंची मदत असली पाहिजे; ह्मणजे तो अमुक गोष्ट साध्य करून अमुक स्थिति प्राप्त करणें आहे हें चांगलें ठरवून एक निश्चयानें त्या धोरणानें चालतो.

संसारांत प्रत्येक मनुष्याला संपत्तीची विशेष अपेक्षा असते; तर ती प्राप्त करून घेण्याकरितां प्रथम साधन ह्मणजे आपलें स्वातंत्र्यसंपादन. जोंपर्यंत तुह्मी दुसऱ्याचे ओशाळे आहां, तोंपर्यंत तुह्मी कधींही उच्च स्थितीस पोंचणार नाहीं. तुह्मी कितीही धूर्त व कितीही बुद्धिवान् असून जर तुह्मी सावधगिरीनें न राहिलां आणि एक धोरणानें न चाललां तर तुमची या संसारांत कधींही तड लागणार नाहीं.

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

उद्यां तुह्मास राज्यपद मिळण्याचा संभव ह्मणून आज आपलें सर्वस्व घालवूं नका, कारण असें केल्यानें आपले जवळ असेल तें जाऊन ज्याची इच्छा धरली तें पुढें मिळेल किंवा नाहीं याची खात्री नाहीं. पुष्कळ अल्पानुभवी तरुण गृहस्थ असें ह्मणतात कीं, कांहीं धाडस केल्याशिवाय काय साध्य होणार आहे? होईन तर राजा, नाहीं तर भिकारी, किंवा होईन तर जगत्शेट, नाहीं तर चोर. मोठ्या पदाच्या लोभानें आज जें कांहीं थोडें बहुत तुमचेजवळ असेल तें घालवून पुढच्या आशेवर भिकारी बनण्यापेक्षां कदाचित् मोठें पद नच मिळालें तरी तुमचें स्वातंत्र्य राहील अशा बेतानें तुह्मी वागलां तर हजार हिश्शांनीं तुम्ही चांगल्या स्थितीला पोहोंचाल. परंतु आपल्या संपत्तीचा, आपल्या नांवाचा, आपले सद्यःस्थितीचा जुगाऱ्याप्रमाणें व्यय केलात तर बहुतेक अंशीं जी जुगाऱ्यांची दशा तीच तुमचीही होईल यांत आश्चर्य नाहीं. ह्मणून संपत्ति मिळविण्याकरितां प्रथम तुह्मीं आपलें स्वातंत्र्य राखिलें पाहिजे इतकेंच नाहीं, तर पैशासंबंधीं दिवसानुदिवस जास्ती स्वातंत्र्य मिळविलें पाहिजे. दोन पैशांकरितां कोणावर अवलंबून राहण्याचा प्रसंग अगदीं वाईट; तेणेंकरून तुह्मी पराधीन होतां, शिवाय तुमच्या मनाला काळजी असल्यामुळें तुह्मास कामधंदाही सुचत नाहीं.

स्वातंत्र्य ह्मणजे विनधास्त वागण्याचें सामर्थ्य. तसें करण्यांस तुह्मांस जी शक्ति पाहिजे ती प्रथम हस्तगत करून घ्या. ज्याप्रमाणें शहाणा नावाडी आपलें गलबत कोणत्या बंदरीं नेणें आहे हें अगोदर ठरवून त्य धोरणानें सुकाणूं लावितो, त्याप्रमाणें तुह्मांस या संसारसागरांत प्रथम स्वातंत्र्य संपादन करण्याचें धोरण ठेविलें पाहिजे. हा हेतु पार पाडण्यास मुख्य साधन पैसा होय. पैशाचा थोडाबहुत तरी संचय करावा. एकदां संचय झाला म्हणजे तुम्ही पाहिजे तें काम हातीं घेऊं शकाल. पैशाचा संचय करण्यासाठीं उत्पन्नापेक्षां खर्च सदोदित कमी ठेवावा. कांहींतरी शिलक मागें टाकीत जावी. एक रुपया कां होईना; पण तितका तरी मागें टाकला पाहिजे. एक रुपया शिलकेस पडला तर त्यापासून

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

असें स्पष्ट दिसतें कीं, तुम्हांस कोणाचें देणें नाहीं. दुसऱ्याचें देणें ठेवून आपण कितीही पैसा जमा केला तरी ती शिल्लक नव्हे.

ज्याला एकदां उधळेपणाची संवय लागलेली असते, त्याला त्याच्या नेहेमींच्या सर्व वस्तूंची आवश्यकता आहे असें वाटूं लागतें. आणि तो म्हणतो याच वस्तु घेण्यास जर मला मिळतो तितका पैसा पुरत नाहीं, तर मी शिल्लक ठेवूं कोठून? त्याला माझें उत्तर एकच; कीं जर जास्ती पैसा मिळविण्याचें आज साधन नाहीं, तर हरतऱ्हेनें तुम्हीं आपल्या खर्चाचीं तोंडें अवश्य कमी केलीं पाहिजेत. तुमच्या पैकीं कोणाचें उत्पन्न ३,००० रुपये आहे, त्याणें जर ते सर्व रुपये खर्च केले तर त्याची सदोदित अडचणच. शिल्लक नाहीं. पैसा वेळेवर हातार्शी नसला म्हणजे जरा गरज लागली कीं शोधा मारवाड्याचें दुकान. पण तुम्ही दरसाल २,५०० रुपये खर्च करून ५०० रुपये शिल्लक ठेवाल तर ते तुम्हांस सदोदित उपयोगीं पडतील. हें लक्ष्यांत बाळगून तुम्ही चाललां तर तेच रुपये तुमचे हक्काचे राहिल्यानें पाहिजे त्या वेळीं तुम्हांस कामीं पडतील. परंतु तुम्हांस असें वाटतें कीं दर वर्षास ५०० रुपयांचा खर्च कमी करण्याकरितां कदाचित् आज एक घोडा कमी केला पाहिजे किंवा दोन चार चाकरलोकांस रजा दिली पाहिजे, आणि त्यापासून लोकांत आपली योग्यता कमी होईल; तर ही अगदीं भ्रांति आहे. तुम्हीं गैरशिस्त खर्च वाढविला हीच चूक केलीत आणि आज आपली योग्यता कमी होईल, लोक आपणांस हंसतील, वगैरे वेडगळ विचार मनांत आणून आणखी जास्ती वाईट स्थितींत पडूं पाहतां. आज लोकांच्या उपहासाला भिऊन खर्च आंवरून घरिला नाहीं तर पुढें अशी वेळ खचीत येईल कीं, लोकांचा उपहास एकीकडे राहून त्यांचा अट्टहास मात्र तुमच्यावर कोसळेल. मग त्याचा प्रतिकार करण्यास तुम्हांस मुळींच सवड रहाणार नाहीं. हातभर खोल पाया घालून वर चार मजले इमारत चढविली तर ती इमारत एखादा पावसाळा निभावली तर फार. तद्वत् आद्यापेक्षां खर्च जास्ती करण्याची दशा आहे. त्याचा डामडौल

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

पोकळ असल्यामुळें भ्रमाचा भोंपळा लौकर फुटून चोहींकडे छी, थू, होते. त्यापेक्षां प्रारंभापासून विचारानें वेताबाताचा खर्च ठेवून पायरीपायरीनें चढवीत गेलें तर हितावह होईल, यांत संशय नाहीं. याचा तुम्हीच शांतपणें विचार करा. शिवाय तुम्ही आज वर्षाचे ३, ००० रुपये खर्च करितां तर निश्चयात्मक बुद्धीनें जर २, ५०० रुपये खर्च करण्याचें ठरविलें तर खचीत होऊं शकेल. प्रत्यहीं कांहीं तरी शिल्लक ठेविण्याचें ठरलें म्हणजे तसें करण्यास कांहीं नवीन युक्ति सुचते. मोठमोठ्या राष्ट्रांची सुद्धां शिलकेवर पत अवलंबून असते. इंग्लंड, फ्रान्स, वगैरे पश्चिमेकडील मोठालीं राज्यें सुद्धां शिल्लक पाडण्याची सदोदित खटपट करीत असतात. मग दरएक मनुष्यानेंही असा यत्न कां करूं नये. जितकी जास्ती शिल्लक तुम्ही मागें टाकाल तितकें पुढें तुम्हांला हितावह होईल. मला असें वाटतें कीं, दरएक मनुष्यानें हरप्रयत्नेंकरून आपला उत्पन्नाचा निर्म्मा हिस्सा शिल्लक ठेवावा. निम्मे नाहीं तर तृतीयांश, नाहीं तर षष्ठांश; मिळून निम्मेपासून षष्ठांशापर्यंत अवश्य शिल्लक ठेविली पाहिजे. यापासून कांहीं दिवस अडचणशी वाटेल परंतु एकदां संवय झाली म्हणजे किती फायदा आहे याचा अनुभव तुम्हांस थोडक्याच काळांत येईल. गरिबी आणि अडचण यांत फार अंतर आहे. गरिबी हा शब्द केवळ समजुतीवर अवलंबून आहे. असें समजा कीं, तुमचें उत्पन्न शंभर रुपये आहे, आणि दुसऱ्याचें दहा हजार रुपये आहे. तर दहा हजारांचे मालकापेक्षां तुम्ही गरीब खरे, परंतु ज्याचें दहाच रुपये उत्पन्न आहे त्याच्यापेक्षां तर श्रीमंत कीं नाहीं? वरें, ज्याचें उत्पन्न १०,००० चें आहे, आणि खर्चही तितकाच आहे, त्याचें उत्पन्न एखादे वर्षीं वेळेवर आलें नाहीं ह्मणजे त्याची खर्चाची चणचण उडून जाऊन कर्ज काढावें लागतें; आणि मग तो अडचणींत सांपडतो. पण तुमचे शंभर रुपयांचे उत्पन्नांतून तुह्मी पन्नास शिलकेंत टाकतां तर तुह्मी कधींही अडचणींत सांपडणार नाहीं. मी ह्मणतों कीं, मनुष्य गरीब किंवा श्रीमंत हें दुसऱ्यावरोवर तुलना केल्यानें कळतें, आणि त्यांत कांहीं मोठेंसें महत्त्व

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

नाहीं. परंतु सुखी असणें आणि कधीं अडचणींत न सांपडणें हें आपलें आपणावर अवलंबून आहे. तर मीं जे वर तीन नियम सांगितले त्यांतून आणखी एक चवथा निघाला असें मला वाटतें. तो कोणता तर ज्या मनुष्याला अडचणींत सांपडण्याची इच्छा नाहीं व सुखांत रहाणें आहे त्यानें आपले उत्पन्नाचा अर्धा हिस्सा किंवा अर्ध्यापासून षष्ठांशपर्यंत शिल्लक ठेवावा. नुसत्या देखोदेखी हेव्यानें आपला खर्च वाढवूं नये. शेजाऱ्याची दोन घोड्यांची गाडी आहे ह्मणून मीही तशी ठेवीन, किंवा शेजारी पन्नास रुपयांचें पागोटें घालतो ह्मणून मीही पाहिजे ती खटपट करून तसें पागोटें घालीन, हें अति वाईट. त्याचे पागोट्यामुळें किंवा त्याचे गाडीमुळें त्याला सर्वत्र मान मिळतो, ही समज खोटी आहे. तुमचा मूर्खपणा व बाह्यात्कारी डौल लोकांचे लक्ष्यांत कधीं तरी येईल. तुह्मीं पोक्त विचारानें अगदीं अवश्य जो खर्च असेल तो करून शिल्लक पाडली तर थोडक्याच दिवसांत लोक तुमची खुषामत करूं लागतील; व तुमच्या उधळ्या शेजाऱ्यापेक्षां तुह्मांस जास्त मान देतील यांत संशय नाहीं.

पैसा ह्मणजे पत, व पैसा ह्मणजे शक्ति असें मीं वर सांगितलेंच आहे. ही पत किंवा ही शक्ति ज्या मानानें तुह्मी पैसा खर्च करितां त्यावर फारशी अवलंबून नाहीं, परंतु आज तुमचेजवळ किती पैसा शिल्लक आहे व आज तुमचे मनांत आल्यास तुह्मी दुसऱ्याला किती देऊं शकाल, याचेवर अवलंबून आहे. याचा खरा प्रत्यय आपणास उतार वयांत येतो. ज्वानीचे भरांत कशाचीच पर्वा नसते. आपणास वाटतें कीं मी पाहिजे तेथून पैसा काढीन. पण वृद्धापकाळीं जेव्हां आपले हातपाय थकतात, त्या वेळीं जर आपणाजवळ शिल्लक नाहीं तर कोणीही आपणास विचारीत नाहीं. मुलेंबाळें, भाऊबंद, इष्टमित्र, सोयरेधायरे, सर्व आपली हेळणा करूं लागतात. आपणास मिळविण्याची शक्ति नसते ह्मणून त्यांचींच आर्जवें करून जगांत दिवस काढावे लागतात. हीं वाक्यें प्रथमावलोकनीं चमत्कारिक वाटतील. परंतु ह्या सर्व गोष्टी ढळढळीत अनुभवास येणाऱ्या आहेत. कोणताही विषय अनुभवाशिवाय खरा वाटत नाहीं. केवळ उपदेशावरच अवलंबून

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu

CC-0. In Public Domain. Digitization by eGangotri.Funding: MIDF

वागणारा शंभरांत एखादा. लहान मुलास देखील दिव्याजवळ खेळूं नये, हात भाजेल, ह्मणून सांगितलें तर हात भाजेपर्यंत तें खरें वाटत नाहीं. तुह्मांसही अनुभव येईपर्यंत सांगितलेल्या गोष्टी कदाचित् खऱ्या वाटणार नाहींत; आणि मी तुह्मास त्याविषयीं बोललोंही नसतों. पण पैशाच्या व्यवस्थेवद्दल अनुभव आल्यानंतर आपली वागणूक सुधारण्यासाठीं बहुतकरून मनुष्यास वेळ रहात नाहीं. यास्तव माझें तुह्मांस वारंवार सांगणें हेंच आहे कीं, तुह्मी या जगांत जर अब्रूनें, शांततेनें व सुखानें दिवस घालवूं इच्छितां तर आपले पैशाचा व्यय सन्मार्गानें व फार विचारानें करा. सदोदित कांहींतरी शिल्लक ठेवण्याकडे अवश्य लक्ष्य द्या. पैशाचा चांगल्या विचारानें व्यय केला आणि आपले जवळ पुष्कळ शिल्लक असली ह्मणजे आपणांस एक तऱ्हेची शक्ति असते. शिपाई लढावयास उभा राहिला आणि त्याची तरवार चांगली आहे असें त्याला माहित असलें ह्मणजे, त्याला लढण्यास स्फुरण येतें. पण तीच तरवार मोडकी आहे असें त्याला माहीत असलें ह्मणजे तो मारून मुटकून लढावयास उभा राहतो. तुमच्या हाताशीं पैसा असला म्हणजे तुम्ही पाहिजे ती संसारांतील जिन्नस संपादन करूं शकतां. ज्ञान, कौशल्य व शहाणपणा हीं श्रेष्ठ खरीं, पण त्यांच्या सामर्थ्यानें तयार झालेली संसारसुखोपयोगी जिन्नस पैसा आपले मालकास साध्य करून देतो. पैशानें अक्कल किंवा ज्ञान येत नाहीं, परंतु पैशाचे जोरावर दुसऱ्याचे ज्ञानाचा किंवा अकलेचा उपयोग करून घेतां येतो. तुमचेजवळ पैसा असेल तर सर्व जगांतील विद्वानांचे ग्रंथ तुम्ही जमा करूं शकाल, उत्तम चिताऱ्यांनीं केलेलीं चित्रें तुह्मी मिळवूं शकाल, वेळेस दूरदूरचे विद्वानांस आपले जवळ आणूं शकाल. अतिकुशल कारागिरांनीं केलेलीं यंत्रें वगैरे सर्व पदार्थ तुह्मांस मिळतील. हें कशामुळें? जवळ पैसा असल्यामुळें. संपत्तीला आपले लोक देवी मानतात हें यथार्थ आहे; कारण [illegible]चा ज्याचेवर अनुग्रह होतो तो या जगांत सर्वत्र पूज्य होतो.

मीं वर सांगितलें आहे कीं, ज्याला या जगांत सन्मार्गानें पैसा मिळ-

Nepal Sanskrit University, Balmeeki Campus, Kathmandu